म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा. वा.
दा. क्र. २०१४

२०१४

# रशियन बालकथा

IRBK-0102014
IRBK-0102014

२।७।३

# ...यन बालकथा

म. ग्रं. सं. ठाणें
विषय बालवाङ्मय
वा. नं. २२८



म. ग्रं. सं. ठाणें
विषय बालवाङ्मय
वा. नं. १६७

द. र. कोपर्डेकर प्रकाशन

4 MAY 1977

दोन अनुवादित बाल-वीर-कथा

म. ग्रं. सं. ठाणे.
२८.३०.१९८१

# रशियन बालकथा

लेखक

दा. पां. रानडे.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. २०९४ नों. दि
वि. ०११७१ क्र.

मुंबई एजंट

... प्राप्ती.

[ किंम

IRBK-0102014
IRBK-0102014

प्रकाशकः—
दयार्णव रघुनाथ कोपर्डेकर.
५२९ सदाशिव, पुणें २.

प्रथमावृत्ति १९४४

मुद्रकः—
शं. मो. पाटील
बिश्वास छापखाना [ लोकशक्ति मंदिर ]
२९१ शनिवार, पुणें २.

म. ग्रं. सं. ठाणे

# वेडा मुलगा

दुपारची वेळ होती. एका रशियन खेड्याच्या परिसरापाशीं कांहीं जर्मन सैनिक येऊन थडकले होते. अमुक मैल गेल्यावर अमुक एक खेडें लागेल असा त्यांना हुकूम होता. पण त्या अंतरावर येऊन सुद्धां त्यांना त्या खेड्याचा मागमूस सुद्धां दिसत नव्हता, आणि म्हणूनच सारे जर्मन सैनिक गोंधळून गेले होते. त्या खेड्याचा शोध घेत असेंच पुढें जावें कीं येथूनच मागें परतावें या संदेहांत ते पडलें होते. कारण उगीचच पुढें जावें तर रशियन गनिमी सैनिकांचें संकट त्यांना भेडसावीत होतें.

खरी परिस्थिति अशी होती कीं, जर्मन सैनिक आपल्या खेड्यावर चालून येत आहेत अशी बातमी त्या लोकांना अगोदरच लागली होती व त्यामुळें आपलीं घरेंदारें पार उध्वस्त करून, त्या खेड्यांतील धान्यांचे व इतर जीनोपयोगी वस्तूंचे साठे बरोबर घेऊन सारे लोक केव्हांच दुसरीकडे निघून गेले होते. आणि त्यामुळेंच तेथें एकादें खेडें

होतें कीं नव्हतें अशी स्थिति निर्माण झाली होती.

इतक्यांत त्यांच्या कानांवर कोकिळेचा ( नाइटिंगेल ) मंजुळ स्वर येऊन पडला. एकदां, दोनदा, चारदां. प्रथम




त्या सर्वांना आश्चर्य वाटलें. आजूबाजूला एकहि झाड दिसत नसतांना, सारें उजाड दिसत असतांना अचानक कोकिळेचा मंजुळ आवाज कोठून येत असावा याचें त्यांना

कोडें वांटलें. बरं ! एकदां नव्हे अनेकदां ? सारे सैनिक आजू-बाजूला पाहूं लागले. पलीकडच्याच एका छोट्याशा टेका-डाच्या पायथ्याशीं एक रशियन पोर बसलेलें त्यांना आढ-ळलें. बारा तेरा वर्षांची असेल स्वारी फार तर. अंगांत मळके कपडे, डोक्याला कांहीं नाहीं, पायांतहि कांहीं नाहीं. त्याच टेकाडाच्या पायथ्याशीं असलेल्या डबक्यांत गळ टाकून त्याकडे लक्ष लावून पहात, तोंडांत बोटें घालून कोकिळेच्या आवाजासारखा आवाज काढीत बसली होती स्वारी आप-ल्याच नादांत. आपल्याभोंवतीं कर्दकाळासारखे भासणारे जर्मन सैनिक उभे आहेत, आपल्याकडे पहात आहेत याचें त्याला जणूं भानच नव्हतें. मात्र ते सारे त्याच्याभोंवतीं गोळा झाल्यावर मात्र तो जरासा बावरल्यासारखा झाला. तो काय करीत होता हें पहाण्यासाठीं एका जर्मन सैनिकानें त्याचीं बोटें बसकन् त्याच्या तोंडांतून काढून घेतलीं. त्या सैनि-काच्या या कृतीनें तो मुलगा जरासा भेदरल्यासारखा झाला. त्यामुळें त्याचें ते कोकिलकूजित बंद पडलें व हीच गोष्ट इतर सैनिकांना आवडली नाहीं म्हणून ते सारे त्या पहिल्या सैनिकावर रागावले व त्याला पाठीमागें ढकलून त्या मुलाला परत तसा आवाज काढावयास ते सांगूं लागले. त्यांच्या अधिकाऱ्यानें तर मोठ्या खुषींत त्या मुलाला कांहीं बक्षीस देण्याचें कबूल केलें. त्याबरोबर खुषींत येऊन त्या मुलानें

पुन्हां तसें आवाज काढावयास सुरवात केली आणि ते जर्मन सैनिकहि खुषींत आले. बऱ्याच वेळां तसा आवाज काढल्यावर तो मुलगा हळूंच त्या अधिकाऱ्याला म्हणाला, मला ' ककूं ' पाक्ष्याचा आवाजहि काढतां येतो !—काढूं कां ? ,'

अधिकाऱ्यानें हो म्हणतांच त्यानें दोन वेळां ' ककूं ' पक्ष्याचा आवाज हुबेहूब काढला आणि तो थांबला. त्या जर्मन अधिऱ्याला एकदम आपल्या कामाची आठवण होऊन तो त्या मुलास त्या खेड्याची, तेथल्या लोकांची, आजूबाजूच्या प्रदेशांतील रशियन गनिमी सैनिकांची माहिती विचारूं लागला. पण त्या मुलानें अशीं कांहीं उत्तरें त्याला दिलीं कीं, तो वेडसर असावा किंवा त्याला कांहींच ठाऊक नसावें असें त्या सैनिकाला वाटलें, नव्हे तशी त्यांची खात्री झाली. तें खेडें पुढेंच जवळ कोठें तरी असावें अशा समजुतीनें त्या सर्वांनीं पुढें कूच केलें.

मात्र तो मुलगा नुसते मासेच पकडण्यासाठीं तेथें बसला होता असें नव्हे. वरवर दिसणाऱ्या वेडपटपणांत नि अज्ञानांत खूप शहाणपणा, अलोट देशप्रीति भरली होती. त्या रानदांडग्या जर्मन सैनिकांत पोरकटपणानें मिसळण्यांत केवढें तरी धारिष्ट दिसून येत होतें. मंजुळ वाटणाऱ्या कोकिळकूजनांत वा ' ककूं ' पक्ष्यांच्या आवाजांत खोल अर्थ होता, आणि तो इतर कोणाला समजत नसला तरी शेजारी रानांत दडून

बसलेल्या रशियन गनिमी सैनिकांना बरोबर कळत होता. त्या मुलानें एकंदर बत्तीस वेळां कोकिळेचा आवाज व दोन वेळां ‘ कुकू ’चा आवाज काढला होता. यावरून त्या झाडींत बसलेल्या गनिमी सैनिकांनीं नक्की ओळखलें होतें कीं, एकंदर बत्तीस जर्मन सैनिक बरोबर दोन मशीनगन्स घेऊन निघाले आहेत.

—आणि हा इशारा मिळतांच त्या रशियन गनिमी सैनिकांनीं त्या बत्तीस जर्मन सैनिकांवर चाल करून त्यांचा निःपात केला व त्यांच्या बरोबरच्या दोन्ही मशीनगन्स जिंकल्या.

अर्थात् या सर्वाचें श्रेय त्या वरवर वेडपट दिसणाऱ्या पण अंतर्यामीं देशभक्तीनें प्रेरित झालेल्या छोट्याशा वीरालाच होय.



म. ग्रं. सं. ठाणे.

# छोटा बाहिर्जी

## ॲलेक्सी ॲंड्रोव्हिज ! ॲलेक्सी ॲंड्रोव्हिज ! !

आज रशियांतील बालांपासून वृद्धापर्यंत प्रत्येकाच्या तोंडीं हें नांव झळकत असतें. त्याच्या पराक्रमाच्या अनेक दंतकथा प्रत्येकजण दुसऱ्याला आपल्या रसभरित वाणीनें सांगत असतो आणि ऐकणाराहि मोठ्या उत्सुकतेनें नि जणूं हृदयाचे कान करून ऐकत असतो.

उद्यांच्या महाकाव्याचा नायकच आहे ॲलेक्सी ॲंड्रोव्हिच म्हणजे. त्याच्या पराक्रमाच्या, त्याच्या चातुर्याच्या, त्याच्या देशप्रीतीच्या अनेक गोष्टी आज रशियन लोकांच्या हृदयांत घर करून आहेत, नि यापैकीं प्रत्येकांवर एकेक महाकाव्य निर्माण होणार आहे.

असा हा ॲलेक्सी ॲंड्रोव्हिच आहे तरी कोण? आणि केवढा? आणि त्यानें असे अद्भुत पराक्रम तरी कोणते केले आहेत ?

## छोटा बहिर्जी

पश्चिम आघाडीवरची एक जागा. कोणशीशी एक नदी वाहात असते. त्या नदीच्या एका तीरावर रशियन सैन्याचा तळ पडला होता व दुसऱ्या तीरावर जर्मन सैन्य मुक्काम करून होतें.

एके दिवशीं संध्याकाळच्या वेळेस अलीकडच्या तीरावरील रशियन सैन्याच्या अधिकारापुढें एक लहानसा पोरगा धांवत धांवत आला नि म्हणाला, मला तुमच्याशीं कांहीं बोलाव-याचे आहे." त्या लहानशा मुलाचें धाडस पाहून कौतुकानें तो अधिकारी उठला व त्याला बाजूला घेऊन गेला. तेथें त्या मुलानें त्या अधिकाऱ्याला आपल्या खिशांतल्या कांहीं जिनसा काढून दिल्या. त्यापैकीं सात पांढरें खडे होते, तीन लाक-डाच्या ढलप्या होत्या व पांच गांठी बांधलेली एक सुतळी होती. त्यानें दिलेल्या त्या वस्तूंकडे आश्चर्यानें तो अधिकारी पाहूं लागला. या सर्वांचा अर्थ त्याला समजला नाहीं हें त्या मुलानें लगेच ओळखलें व हळूं आवाजांत तो त्याला सम-जावून देऊं लागला. " पांढरें खडे म्हणजे खंदकांतील तोफा, काळे खडे म्हणजे टँक्स, लांकडी ढलप्या म्हणजे मशीनगन्स नि सुतळीला घातलेली एक गांठ म्हणजे फिरत्या तोफ-खान्याची एक तुकडी समजावयाची."

—त्या पोराच्या बातमीवरून नदीच्या पलीकडील जर्मन सैन्याच्या तुकडींत सात खंदकांतल्या तोफा, पांच टँक्स,

तीन मशीनगन्स व फिरत्या तोफखान्यांच्या चार तुकड्या होत्या.

ही माहिती मिळाल्याबद्दल वाटणारा आनंद तोंडावर दाखवीत त्या अधिकाऱ्यानें विचारलें, कोणी ही बातमी मिळविली ? कोणी तुला आमच्यामडे पाठविलें ? "

", ॲलेक्सी ॲंड्रेव्हिच ! " त्या पोरानें तात्काळ उत्तर दिलें. पण या नांवापलीकडे तो एक शब्दहि ॲलेक्सीबद्दल सांगावयांस तयार झाला नाहीं.

दुसऱ्या दिवशीं तोच मुलगा परत आला व त्यानें तशीच आणखी बरीच माहिती त्या रशियन अधिकाऱ्याला दिली. इतकी अचूक नि अफाट माहिती ऐकून त्या रशियन अधिकाऱ्याला आनंद तर झालाच, पण त्याच्या आश्चर्याला पारावारच राहिला नाहीं. त्यानें पुन्हा विचारलें, " ही बातमी कोणी जमा केली ? कोणी पाठविलें ? " त्या मुलानें पुन्हां उत्तर दिलें, ' ॲलेक्सी ॲंड्रेव्हिच ! '—पण यापलीकडे त्या व्यक्तीबद्दल अगर त्याच्या ठावठिकाणाबद्दल त्यानें एक शब्दहि सांगितला नाहीं. तो अधिकारी आपला आग्रह सोडीत नाहींसें पाहून तो पोरगा उत्तरला, " युद्धाचा आणीबाणीचा काळ आहे हा. या काळांत एक शब्दहि अधिक-उणा बोलणें धोक्याचें असते. शिवाय ॲलेक्सीनें मला तसा हुकूम केला आहे. " त्या अधिकाऱ्याचा इलाजच नव्हता.

२५१३
क्र. १७



अशाच तऱ्हेनें अनेक वेळां तो मुलगा येत गेला, अनेक प्रकारची महत्त्वाची माहिती रशियन सैनिकांना देत गेला. कोणी विचारलें तर दर वेळा तो सांगे, मला ॲलेक्सी ॲंड्रे-व्हिचनें पाठविलें आहे. बस्. यापेक्षां एक शब्दहि तो बोलत नसे. येवढ्यावरून त्या रशियन अधिकाऱ्यानें अनुमान काढलें कीं, तो अज्ञात ॲलेक्सी ॲंड्रेव्हिच म्हणजे कोणी तर वयस्कर पटाईत असा हेर असावा.

अशीच एका संध्याकाळची गोष्ट. तो अधिकारी आपल्या तंबूत बसला असतां एका सैनिकानें येऊन निरोप सांगितला, " तेरा चौदा वर्षांचा एक मुलगा आपली भेट मागत आहे." त्या अधिकाऱ्यानें त्याला आंत आणण्यांस सांगितलें. अर्ध्या चड्डींतला, डोक्यावर व पायांत कांहींच नसलेला, पण हंसत-मुख आणि तेजःपुंज असा एक मुलगा आंत आला. " माझी ओळख मी स्वतःच करून देतों आधीं व मग...." तो मुलगा आपण होउनच त्या अधिकाऱ्याशीं अगदीं सलगीनें बोलूं लागला. माझे नांव ॲलेक्सी ॲंड्रेव्हिच."

हे शब्द ऐकतांच एकदा विजेचा झटका बसावा तसेंच त्या अधिकाऱ्याला झालें. ॲलेक्सी, आणि हा लहानसा पोरगा ज्याला आपण वयस्कर, पटाईत हेर समजत होतों, ज्यानें ज्यानें दररोज अमूल्य माहिती आपणाला पुरविली तो एक लहानसा पोरगा निघावा हे पाहून त्या रशियन अधिका-

त्याचा ऊर भरून आला. त्या मुलाबद्दल त्याला एकदम इतका आदर वाटला; इतका अभिमान वाटला कीं, त्याच्या तोंडून त्याचें नांव ऐकतांच त्याचा मान राखण्यासाठीं तो ताडकन् उठून उभा राहिला. ॲलेक्सी अँड्रेव्हिच या नांवांत आणि त्या नांवाच्या व्यक्तीनें केलेल्या कार्यात येवढी जादू होतीच होती.

मग बोलतां बोलतां ॲलेक्सीनें आपली सारी माहिती त्या अधिकाऱ्या सांगितली. त्या नदीवर इकडून तिकडे आपल्या होडींतून माणसें नेण्याचें काम करीत असे. त्याच्या त्यानें ' फॅसिस्टाचें थडगें ' या अर्थाचे एक नांव ठेवलें होतें. ती होडी म्हणजे नावालाच एक होडी होती म्हणा ना. चार फळकुटें एकत्र जोडलेलीं होती एवढेंच. पण नदीवर इकडून तिकडे करण्याचें काम होत असे त्यांतून. तसेंच ॲलेक्सीनें आपल्या हाताखालीं आपल्याच वयाचीं आठ मुलें ठेवलीं होतीं. त्या सर्वांचा तो पुढारी होता. होडीवर इकडून तिकडे करण्याच्या निमित्तानें तो दोन्ही तिरावर स्वैर विहार करी. जर्मन सैन्यांतहि फिरे व तिकडून माहिती गोळा करून आपल्या रशियन सैनिकांना देत असें. या खेपेस त्यानें आपल्या होडग्यावरून तीन रशियन जखमी सैनिक सोड-वून आणलें होतें. त्या जखमी सैनिकांना त्यानें कसेबसें नदीपार आणलें होतें. पण आता त्यांना लौकर त्यांच्या

लोकांत आणून सोडण्याकरितां कांहीं माणसांची मला गरज होती, म्हणून ती मदत मागण्याकरितां ॲलेक्सी स्वतः आला होता. अर्थात् त्या अधिकाऱ्यानें ॲलेक्सीला लागेल ती मदत देऊन त्या तिन्ही सैनिकांना तेथल्याच हॉस्पिटलमध्यें पाठविण्याची व्यवस्था केली. पण त्या छोट्या ॲलेक्सीच्या पराक्रमानें नि वारंवार त्याच्याकडून होणाऱ्या अद्भुत कामागिरीनें तो इतका कांहीं मोहून गेला कीं, त्यानें ॲलेक्सीला मुद्दाम आपल्याजवळ बसवून त्याच्याबद्दल अधिक माहिती काढण्याचा त्यानें प्रयत्न केला. जर्मन सैनिकांच्या तावडींतून आजपर्यंत हीं पोरें वाचलींच कशीं याचेंच राहून राहून त्या अधिकाऱ्याला आश्चर्य वाटत होतें. त्यावर ॲलेक्सीनें त्याला शांतपणें सांगितलें, " या नदीला असेंच पुढें गेलें कीं जें बांकण लागतें त्याच्या तिथें असलेल्या टेकडीच्या पायथ्याशीं असलेल्या दाट जंगलांत आम्ही आमचे निवास्थान ठेवलें आहे. त्या दाट जंगलाशीं यावयास जर्मन सैनिक धजत नाहींत कीं त्यांचें तिकडे लक्ष जात नाहीं म्हणा, पण त्यामुळें आम्ही सारे आजपर्यंत वाचलों आहोंत खरें."

दुसऱ्याच दिवशीं ॲलेक्सी पुन्हां स्वतःच अधिकाऱ्याकडे आला. आज त्याच्याबरोबर त्याचे दोन हस्तकहि होते. दुसऱ्या किनाऱ्यावरील जर्मन सैन्यांत बरीच हालचाल आदल्या दिवशीं झाली होती. कांहीं नव्या पलटणी तेथें

येऊन थडकल्या होत्या असें त्या अधिकाऱ्यानें ऐकलें होतें म्हणून ॲलेक्सी आल्याबद्दल त्याला आनंद झाला. ॲलेक्सीहि पण तीच बातमी द्यावयास तेथें आला होता. त्यानें नवें सैन्य केव्हां आलें, कसें आलें वगैरे बातमी सांगून त्यांनीं आपला मुकाम कसा याचें एक चित्र काढून दाखविलें. त्यांच्याजवळ दारुगोळा कितीसा आहे हें त्या अधिकाऱ्यानें विचारल्यावर त्यानें आपल्या एका हस्तकाला आपले खिसे मोकळे करण्यास सांगितलें. त्यांच्या खिशांतून काळे पांढरे खडे, लाकडी ढलप्या, गांठी मारलेल्या सुतळ्या बाहेर पडल्या. बरं, हत्या-रेंपात्यारें किती म्हणून त्या अधिकाऱ्यानें विचारतांच त्यानें दुसऱ्या मुलाला आपला खिसा रिकामा करण्यास सांगितलें. त्याच्या खिशांतून निरनिराळ्या प्रकारचे शंख नि शिंपले बाहेर पडले.

ही सर्व माहिती एकाच मुलाजवळ देऊन त्याला कां पाठवित नाहीं असें त्या अधिकाऱ्यानें विचारतांच ॲलेक्सीनें उत्तर केलें, ' इतक्यांत कष्टानें मिळविलेली माहिती एकाच-जवळ ठेवणें नेहमींच धोक्याचें असतें. तोच पकडला गेला कीं संपलें सारें. म्हणून नेहमींच अशी माहिती आम्ही आठ जणांत पसरून ठेवतो. ' त्या छोट्याशा मुलाच्या कल्पनांपुढें लष्करी तज्ज्ञ असा तो अधिकारी, पण त्यानें मान खालीं घातली.

त्याच रात्रीं ॲलेक्सीनें ऐशी जर्मन बंदुका आणून त्या अधिकाऱ्याला दिल्या; त्या अधिकाऱ्याला ॲलेक्सीचें किती कौतुक करावें नि किती नको असें होऊन गेलें. 'कोठून या बंदुका आणल्या' असें विचारल्यावर त्यानें उत्तर केलें, "जर्मन सैन्यांत ज्या ज्या वेळीं म्हणून उत्सव चालतात त्या त्या वेळीं आम्ही त्यांच्या पाळतीवर असतो. कारण अशा वेळीं सारे सैनिक चिकार दारू पिवून बेहोष होतात, मग आम्ही जें सांपडेल तें चोरून आणतों."

त्या रात्री ॲलेक्सीला आणि त्याच्या साथिदारांला त्या अधिकाऱ्यानें आग्रहानें आपल्या तंबूत जेवावयास ठेवून घेतलें आणि रात्री त्या छोटया वीरांची झोंपण्याची उत्तम व्यवस्था केली.

सकाळीं उठतांच त्या अधिकाऱ्यानें आपल्या साऱ्या सैनिकांसमोर ॲलेक्सीचा गौरव केला. "तूं आपल्या पितृदेशासाठीं जें थोर कार्य करीत आहेस त्याबद्दल तुला कोणतें बसीस देऊं?"—हे त्याचे शब्द ऐकतांच ॲलेक्सीला गहिंवरून आलें. तो अधिकारीहि गहिंवरला. सारे लोकहि गहिंवरन. त्या अधिकाऱ्यानें आपल्याला मिळालेलें मानाचें पदक आपल्या कोटावरून काढून तें ॲलेक्सीच्या सदऱ्याला लावलें.

दोन मिनिटें सर्वजण स्तब्ध होते. पण ती स्तब्धता

ॲलेक्सीनेंच मोडली. तें पदक परत करीत तो म्हणाला, " हें आपल्याचजवळ राहूं द्या. मी उद्यां जर शत्रूच्या हातीं सापडलों नि त्यांनीं हें पदक माझ्याजवळ पाहिलें तर त्यांना मी हेरच होतों ही खात्री वाटेल व पुढें मला तुमच्यासाठीं कांहींच करतां येणार नाहीं. म्हणून हें पदक मजजवळ नको.

—आणि एवढें बोलून तो आपल्या सहकाऱ्यांसह तेथून निघून गेला.

त्याचें कार्य अजूनहि चाललेंच असावें.



म. ग्रं. सं. ठाणे, ग्रंथालय ठाणे
अ. क्र. 2018 नों. दि ..........
वि ..... ग्रा.वा. क्र. ..........

IRBK-0102014

IRBK-0102014

# आमचें प्रकाशन

| | | रु. |
|---|---|---|
| १ | तीन मुलें — साने गुरुजी | २॥ |
| २ | क्रांति— ,, | ३ |
| ३ | स्त्रीजीवन १ व २ ,, | २॥। |
| ४ | मुलांसाठीं फुलें— ,, | -।- |
| ५ | समाधीवरलीं फुलें—वि. स. खांडेकर | २ |
| ६ | अत्तराचे दिवे—वि. वि. बोकील | १॥ |
| ७ | मंगळागौरीच्या रात्रीं ,, | २॥ |
| ८ | मीना-नीना ,, | १ |
| ९ | आया ,, | २॥ |
| १० | कडूसाखर—ग. ल. ठोकळ | १॥ |
| ११ | काव्यकलेचें अंतरंग—के. मारखेडे | २ |
| १२ | आईची माया—ना. धों. ताह्मनकर | १ |
| १३ | जागत्या छाया—अनंत काणेकर | २ |
| १४ | समाज आणि समाजसेवा—काका कालेलकर | १ |
| १५ | मानलेलीं मुलें—मा. भ. नंदुरकर | १॥ |
| १६ | पांढरपेशांचें जग—श्री. ज. जोशी | १॥ |

: प्रकाशक :

**द. र. कोपर्डेकर,**

५२९ सदाशिव पेठ, पुणें २.